# प्रेसनोट

दि. ०७/०२/२०२३

**किवळे तलाठी कार्यालयात मदतनीस म्हणून काम करणा-या इसमावर लाच मागणी प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | देहुरोड पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड, पुणे गु.र.नं. १०२/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७ - अ. |
| तक्रारदार | पुरूष, वय - ३३ वर्षे. |
| आरोपीचे नाव व कार्यालय | नितीन ढमाले, किवळे तलाठी कार्यालय, देहुरोड, पुणे येथे मदतनीस म्हणून काम करणारा खाजगी इसम. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३५,०००/- (पस्तीस हजार रूपये) |

पडताळणी दिनांक :- २६/१२/२०२२.

गुन्हा दाखल दिनांक :- ०७/०२/२०२३.

थोडक्यात माहिती :- रावेत येथील सोसायटीच्या जागेची नोंद ७/१२ उता-यावर करण्यासाठी किवळे तलाठी कार्यालयात मदतनीस म्हणुन काम करणारे नितीन ढमाले यानी किवळे तलाठी यांचेसाठी लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची किवळे तलाठी कार्यालयामध्ये पडताळणी केली असता त्या कार्यालयात मदतनीस म्हणून काम करणारे नितीन ढमाले यानी तक्रारदारांचे बरोबर चर्चा करून किवळे तलाठी यांचेसाठी ३५,०००/- रुपये लाचेची मागणी केली म्हणून वरील प्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटचे पोलीस निरीक्षक संदिप व-हाडे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.